मराठी

# न्यूज एक्सप्रेस

मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल



बातमी व जाहीराती साठी संपर्क साधा!

: ९८३४१३८४८२




# होर्डिंगसाठी झाडांवर कुऱ्हाड

## मोशीतील हवालदार वस्तीमधील प्रकार

**वाकड**

**न्यूज एक्सप्रेस मराठी।** हवालदार वस्ती आळंदी रस्त्यावर रात्रीच्या दोन ते तीनच्या सुमारास होर्डिंगसमोरील झाडांची छाटणी केली जात आहे. मागील काही महिन्यांपासून सातत्याने हा प्रकार घडत आहे. या झाडांची वाढ होऊ दिली जात नसून, होर्डिंगसाठी असा प्रकार केला जात असल्याची माहिती परिसरातील नागरिकांकडून दिली जात आहे. मागील काही महिन्यांपूर्वी मोशीतील शिवरस्त्यावर होर्डिंगसाठीच झाडांची कत्तल करण्यात आली होती. असाच प्रकार हवालदार वस्ती मध्ये होतो आहे. होर्डिंगला चिकटून एक वडाचे आणि दोन पिंपळाची झाडे असून, होर्डिंगला अडथळा ठरत आहेत. त्यामुळे या झाडांची रात्रीच्या वेळी सतत्याने छाटणी केली जात आहे. याकडे महापालिका प्रशासनाने लक्ष ठेवावे अशी मागणी केली जात आहे.




> “काही लोकं रात्रीच्या दोन किंवा तीनच्या दरम्यान येतात, आणि छाडांची छाटणी करतात. या झाडांची वाढ होऊ दिली जात नाही. होर्डींग दिसावे यासाठीच तोडले जात असावे. एक वड आणि दोन पिंपळांची झाडे आहेत.
>
> **-योगेश अहिरे,** नागरिक

> “आकाशचिन्ह विभागाला निवेदन दिलेले आहे. कुठल्याही एजन्सीकडून असे प्रकार केल्यास त्यांचा परवाना रद्द करण्यात यावा असे नमूद केलेले आहे. असे प्रकार घडल्यास त्यांच्यावर कारवाई करण्यात येईल.
>
> **-रविकिरण घोडके,** उद्यान विभाग

# नाट्य संमेलन ही सांस्कृतिक चळवळ : उदय सामंत

## अखिल भारतीय मराठी नाट्य संमेलन सात जानेवारीला पिंपरी चिंचवड शहरात

**पिंपरी-चिंचवड**

**न्यूज एक्सप्रेस मराठी।** शतकोत्सवी अखिल भारतीय मराठी नाट्य संमेलन सहा आणि सात जानेवारी रोजी २०२४ ला पिंपरी चिंचवड शहरात होत आहे. राजकीय जोडे बाजूला ठेवून आम्ही सर्वपक्षीय या नाट्यसंमेलनाचे नियोजन करीत आहोत. नाट्य संमेलन ही एक सांस्कृतिक चळवळ आहे; अशा भावनेतून आम्ही याकडे पाहतो. हे नाट्य संमेलन यशस्वी करण्यासाठी पिंपरी चिंचवडकरांनी सहकार्य करावे, असे आवाहन उद्योग मंत्री आणि मुख्य निमंत्रक उदय सामंत यांनी केले.



चिंचवड भोईर नगर येथील कामगार कल्याण मैदानावर नाट्य संमेलनाच्या मंडपाचे पूजन शनिवारी करण्यात आले. यावेळी सामंत यांनी माध्यम प्रतिनिधींशी संवाद साधला. तत्पूर्वी अखिल भारतीय मराठी नाट्य परिषद, पिंपरी चिंचवड शाखा अध्यक्ष भाऊसाहेब भोईर (झळाऑिळ)यांच्या निवासस्थानी सामंत यांच्या उपस्थितीत नाट्य परिषदेचे पदाधिकारी व प्रतिनिधी यांची आढावा बैठक झाली. यावेळी भाऊसाहेब भोईर, आमदार उमा खापरे, बांधकाम व्यावसायिक राजेश साकला, चित्रपट महामंडळाचे अध्यक्ष मेघराज राजे भोसले, नियामक मंडळाचे सदस्य सतीश लोटके, तळेगाव नाट्य परिषदेचे अध्यक्ष सुरेश धोत्रे, शिरूर नाट्य परिषदेचे अध्यक्ष दिपालीताई शेळके, सचिन इटकर, माजी नगरसेवक राहुल कलाटे, अजित गव्हाणे, मयूर कलाटे, अनंत कोऱ्हाळे तसेच संतोष पाटील, राजेंद्र शिंदे, सुदाम परब, संतोष रासने, राजू बंग, आकाश थिटे, प्रणव जोशी आदी उपस्थित होते.नाट्य संमेलनाच्या अध्यक्षपदी प्रसिद्ध चित्रपट निर्माते डॉ. जब्बार पटेल, राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष शरद पवार स्वागताध्यक्ष तर स्वागत समिती अध्यक्ष उपमुख्यमंत्री अजित दादा पवार, प्रमुख निमंत्रक म्हणून उद्योग मंत्री उदय सामंत काम पाहणार आहेत. पिंपरी चिंचवड शहरातील महासाधू मोरया गोसावी क्रीडांगणावर मुख्य नाट्य संमेलन होईल.

प्रा. रामकृष्ण मोरे प्रेक्षागृह, ग. दि. माडगूळकर सभागृह, आचार्य अत्रे रंगमंदिर, नटसम्राट निळू फुले नाट्यगृह, कै.अंकुशराव लांडगे नाट्यगृह तसेच भोईर नगर कामगार कल्याण मैदानावर बालनाट्य आयोजित केली जाणार आहेत. या नाट्य संमेलनात १६ व्यवसायिक पेक्षा अधिक नाटके, सुमारे एक हजार अधिक कलाकार सहभागी होतील आणि स्थानिक कलाकारांनाही संधी मिळेल, असे भाऊसाहेब भोईर यांनी सांगितले.

# मोशी-प्राधिकरण पेठ ६ मधील नागरिकांसाठी 'ओपन स्पेस'

## स्थानिक नागरिक, सोसायटीधारकांच्या मागणीला यश

**पिंपरी-चिंचवड न्यूज एक्सप्रेस मराठी।** मोशी-प्राधिकरण पेठ क्रमांक ६ येथील स्थानिक नागरिकांच्या पायाभूत सोयी-सुविधांसाठी २० गुंठे जागा राखीव करण्याबाबत पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने मान्यता दिली असून, संबंधित जागेचे रेखांकन करण्याचे आदेश पिंपरी-चिंचवड महापालिका प्रशासनाला दिले आहेत. पेठ क्रमांक ६ व ९ मधील स्थानिक नागरिकांच्या मागणीनुसार, परिसरात मुलांच्या खेळण्यासाठी मैदान, ज्येष्ठ नागरिकांसाठी उद्यान किंवा सुविधा पार्क उपलब्ध नाही. त्यामुळे महापालिका प्रशासनाने ३ ते ४ एकर जागेत पायाभूत सोयी-सुविधा विकसित करण्यासाठी पाठपुरावा सुरू केला होता. तसेच, भोसरी विधानसभा मतदार संघाचे आमदार महेश लांडगे यांनाही याकामी लक्ष घालण्याची विनंती केली होती. तसेच, या भागात असलेल्या दत्त मंदिरामध्ये येणाऱ्या भाविकांनीही या जागेत मूलभूत सुविधा विकसित करण्याची मागणी केली होती. तत्कालीन पिंपरी-चिंचवड नवनगर विकास प्राधिकरणाच्या माध्यमातून पेठ क्रमांक ६ चा नकाशा १९९९ साली मंजूर झाला होता. त्यानंतर दि. ७ जून २०२१ रोजी नवनगर विकास प्राधिकराचे पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरणात विसर्जन झाले. महाविकास आघाडीच्या सत्ताकाळात याकडे दुर्लक्ष झाले. जुलै-२०२२ मध्ये महायुतीची सत्ता राज्यात स्थापन झाल्यानंतर आमदार



लांडगे यांनी पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरण (पीएमआरडीए) कडे पाठपुरावा सुरू केला. त्यामुळे पेठ क्रमांक ६ मधील १.४५ हे. आर जागा पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या ताब्यात देण्यात आली. नकाशाप्रमाणे रहिवाशी जागेस भूखंड क्रमांक १८४ आणि १८५ व खुली जागा क्रमांक ६ क्षेत्र ०.२० हे. आर. असे नकाशात बदल करुन रेखांकन करण्याचे आदेश पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाचे आयुक्त राहुल महिवाल यांनी दिले आहेत. यामुळे सोसायटीधारकांमध्ये समाधान व्यक्त होत आहे. सेक्टर- ६ मधील जलवायू विहास सोयायटीचे किरीट पटेल, सेक्टर- ९ मधील साई पार्क सोसायटीचे दीपक नाईक, प्रगती एम्पायर सोसायटीचे बाळासाहेब पोखरकर, आत्यि वुड्स सोसायटीचे अनिल सैनदाने यांच्यासह स्थानिक नागरिकांनी या निर्णयाचे स्वागत केले आहे. तसेच, या ठिकाणी असलेल्या दत्तमंदिर येणाऱ्या भाविकांनीही आमदार लांडगे यांचे आभार व्यक्त केले आहेत.

> “ परिसरात सुमारे १० हजार लोकवस्ती आहे. मात्र, प्राधिकरणात उद्यान, खेळासाठी मैदान किंवा ज्येष्ठ नागरिकांसाठी खुली जागा नाही. त्यामुळे या भागात 'ओपन स्पेस' असावी आणि पायाभूत सोयी-सुविधा मिळाव्यात, अशी मागणी होती. त्याला यश मिळाले आहे. याकामी पाठपुरावा केल्याबद्दल आमदार महेश लांडगे यांचे आभार व्यक्त करतो. या ठिकाणी असलेल्या दत्त मंदिरात नियमितपणे भाविक येत असतात. त्यांच्यासाठी मूलभूत सुविधा विकसित करावी, अशी अपेक्षा आहे.
>
> **– कौतिक पाटील,**
> रिद्धि-सिद्धी सोसायटी, सेक्टर- ६.

> “ आमच्या परिसरामध्ये गार्डन अथवा मुलांना खेळण्यासाठी क्रीडांगण नाही. त्यामुळे महापालिका प्रशासनाने सुविधा विकसित करावी, अशी सोसायटीधारकांची मागणी होती. त्यानुसार आमदार महेश लांडगे यांनी पुढाकार घेतला आणि संबंधित भूखंड 'ओपन स्पेस' म्हणून विकसित करण्यासाठी यशस्वी पाठपुरावा केला. त्यामुळे सोसायटीधारकांमध्ये समाधानाचे वातावरण आहे.
>
> **– संजय पाटील,**
> यूनिटी एवेन्यू सोसायटी, सेक्टर- ६.

# कमानी, किऑक्सवर विनापरवाना जाहिराती

## महापालिकेचे कोट्यवधींचे नुकसान

**पिंपरी-चिंचवड न्यूज एक्सप्रेस मराठी।** मागील दोन वर्षांपासून शहरातील रस्त्यांवरील कमानी आणि विद्युत खांबावरील किऑक्सवर विनापरवाना जाहिराती झळकत आहेत. निविदाप्रक्रियाच न राबविल्याने हा प्रकार घडत आहे. त्यामुळे जाहिरातदार एजन्सी व ठेकेदारांचा खिसा गरम होत असून, महापालिकेचे आर्थिक नुकसान होत आहे. शहरातील अनधिकृत होर्डिंगचा प्रश्न किवळे येथील होर्डिंग दुर्घटनेत ५ कामगार व मजुरांचा मृत्यू झाल्यानंतर चर्चेला आला होता. त्याबाबत विधिमंडळ अधिवेशनात भरपूर चर्चा झाली. त्यामुळे अनधिकृत होर्डिंगवर कारवाईसाठी काही प्रमाणात पावले उचलली गेली. मात्र, आणखीदेखील अनधिकृत होर्डिंगबाबत आणि विनापरवाना जाहिरातीं बाबत महापालिकेच्या कारभारात सुसूत्रता आलेली नाही. हेच शहरातील रस्त्यांवरील जाहिरात कमानी (गॅण्ट्री), विजेच्या खांबवरील क्युऑक्स आणि चौका-चौकातील फ्लेक्सवरून निदर्शनास येते. या जाहिराती अधिकृतरित्या लावण्यासाठी परवानगी देण्याची नियमावली आहे. त्यातून महापालिकेला उत्पन्नही मिळू शकते. परंतु, त्याची अंमलबजावणी होत नसल्याचे चित्र आहे. गेल्या दोन वर्षांपासून रस्त्यांवरील जाहिरात कमानी (गॅण्ट्री) व विजेच्या खांबावरील किऑक्सबाबत कोणतेही धोरण महापालिकेने केलेले नाही. दोन वर्षांत त्याची निविदाप्रक्रिया राबविली गेली नाही. तर, यावरील विनापरवाना जाहिरातींवर कारवाईची जबाबदारी क्षेत्रीय कार्यालयांना दिलेली आहे. त्यातही सुसूत्रता नाही. परिणामी, अशा विनापरवाना जाहिरातींवर कोणतीही कारवाई होत नसून खासगी बांधकाम व्यावसायिक, राजकीय मंडळी, जाहिरातदार एजन्सी आणि जाहिराती लावणार्या ठेकेदाराचे फायदा होत आहे. यात बांधकाम व्यावसायिक, शैक्षणिक संस्था, वैद्यकीय सेवा अशा विविध व्यावसायिक सर्रास अवैधपणे जाहिराती लावतात. यातून महापालिकेला मिळू शकणारे उत्पन्नही बुडत आहे.

# स्वारगेट ते कात्रज मेट्रो धावणार?

## केंद्राच्या मान्यतेची प्रतीक्षा; अजित पवार निधी देणार

**पुणे। न्यूज एक्सप्रेस मराठी।**

स्वारगेट ते कात्रज मेट्रोचे काम लवकर सुरू (झीपिश चर्शीअें) करण्याचे नियोजन करावे, या मार्गाला केंद्र शासनाची मान्यता मिळाल्यावर राज्य सरकारच्या हिश्श्यातील निधी त्वरित उपलब्ध करून देण्यात येईल, असं उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी सांगितलं. मेट्रो मार्ग आणि अहमदनगर रस्त्यावरील वाहतूक कोंडीबाबत आयोजित बैठकीत ते बोलत होते. अजित पवार म्हणाले, स्वारगेट ते कात्रज मेट्रो मार्गासाठी केंद्र शासन स्तरावर आवश्यक मान्यतेसाठी पाठपुरावा करण्यात येईल. या मेट्रो मार्गावरील स्थानके अत्याधुनिक सुविधांनी युक्त करावी. रामवाडी येथून विमानतळापर्यंत मेट्रो लाईन सुविधा देण्याचा विचार व्हावा. अहमदनगर रस्त्यावरील वाहतूक कोंडी दूर करण्यासाठी तेथील रस्ते आणि पुलांच्या कामांना गती द्यावी. संगमवाडी ते खराडी रस्त्याचे भूसंपादन करण्याची कार्यवाही लवकर करावी. नगररोड परिसरातील अतिक्रमण काढण्याची कार्यवाही करावी. पोलीस विभागाने या भागात वाहतूक कोंडी होणार नाही याची दक्षता घ्यावी, असे निर्देश त्यांनी दिले. नगर रस्त्यावरील खड्ड्यांची दुरुस्ती करण्याची कार्यवाही तातडीने करावी. या मार्गावरील वाहतूक कोंडी टाळण्यासाठी आवश्यक उपाययोजना कराव्या, असेही आदेश त्यांनी दिले.





बैठकीत महामेट्रोचे व्यवस्थापकीय संचालक श्रावण हर्डीकर यांनी उपमुख्यमंत्री पवार यांच्याशी दूरध्वनीवरून चर्चा करताना स्वारगेट ते कात्रज मेट्रो मार्गाच्या प्रगतीबाबत माहिती दिली. या मार्गाचा प्रस्ताव अंतिम मान्यतेसाठी पब्लिक इन्व्हेस्टमेंट बोर्डाकडे विचाराधीन आहे. लवकरच त्यास मान्यता मिळाल्यावर केंद्रीय मंत्रिमंडळाची त्याला मान्यता मिळेल, यानंतर या मार्गावरील काम सुरू करण्यात येईल, असे त्यांनी सांगितले. पुणे शहरातील स्वारगेट ते कात्रज भूमिगत मेट्रो प्रस्तावित आहे. या प्रस्तावाला मंत्रिमंडळाची मान्यता घेऊन केंद्र सरकारला प्रस्ताव पाठवला जाईल, असे मंत्री उदय सामंत यांनी विधानसभेत सांगितलं होतं. स्वारगेट ते कात्रज मेट्रोचा प्रस्ताव केंद्र शासनाकडे गेल्यानंतर राज्य शासन त्याचा पाठपुरावा करून मंजुरी घेईल. खडकवासला ते खडारी हा २५.६५ किमीच्या मेट्रो मार्गाचा डीपीआर राज्य शासनाकडे सादर झालेला आहे. तो देखील मंत्रिमंडळाची मान्यता घेऊन केंद्र शासनाकडे पाठवला जाईल. या मेट्रोचे शेवटचे स्टेशन खडकवासला धरणापर्यंत असावे अशी मागणी केलेली आहे. त्याची देखील संयुक्त पाहणी झालेली आहे. तो प्रस्ताव फिजिबिलिटी रिपोर्टसह शासनाकडे सादर केलेला असून राज्य शासन त्यावर निर्णय घेईल, असे मंत्री सामंत यांनी यावेळी सांगितलं होतं. आता फक्त या मेट्रोसाठी केंद्राच्या मान्यतेची गरज आहे ती मान्यता मिळाली की मेट्रोचा मार्ग मोकळा असेल. अजित पवार म्हणाले, स्वारगेट ते कात्रज मेट्रो मार्गासाठी केंद्र शासन स्तरावर आवश्यक मान्यतेसाठी पाठपुरावा करण्यात येईल. या मेट्रो मार्गावरील स्थानके अत्याधुनिक सुविधांनी युक्त करावी.

### पुलांच्या कामांना गती द्यावी

**» रामवाडी येथून विमानतळापर्यंत मेट्रो लाईन सुविधा देण्याचा विचार व्हावा. अहमदनगर रस्त्यावरील वाहतूक कोंडी दूर करण्यासाठी तेथील रस्ते आणि पुलांच्या कामांना गती द्यावी. संगमवाडी ते खराडी रस्त्याचे भूसंपादन करण्याची कार्यवाही लवकर करावी. नगररोड परिसरातील अतिक्रमण काढण्याची कार्यवाही करावी. पोलीस विभागाने या भागात वाहतूक कोंडी होणार नाही याची दक्षता घ्यावी, असे निर्देश त्यांनी दिले. नगर रस्त्यावरील खड्ड्यांची दुरुस्ती करण्याची कार्यवाही तातडीने करावी. या मार्गावरील वाहतूक कोंडी टाळण्यासाठी आवश्यक उपाययोजना कराव्या, असेही आदेश त्यांनी दिले. बैठकीत महामेट्रोचे व्यवस्थापकीय संचालक श्रावण हर्डीकर यांनी उपमुख्यमंत्री पवार यांच्याशी दूरध्वनीवरून चर्चा करताना स्वारगेट ते कात्रज मेट्रो मार्गाच्या प्रगतीबाबत माहिती दिली.**

# सलग सुट्ट्यांमुळे द्रुतगती मार्गावर वाहतूक कोंडी!

## एक्स्प्रेसवेवर बोरघाटात तब्बल १० किमी वाहनांच्या रांगा

**पुणे। न्यूज एक्सप्रेस मराठी।**

नाताळ सणाला जोडून आलेल्या सुट्ट्यांमुळे मुंबई-पुणे द्रुतगती मार्गावरील वाहतूक विस्कळीत झाली. लोणावळ्यात मोठ्या संख्येने मुंबईतील पर्यटक दाखल झाल्याने सकाळपासून द्रुतगती मार्गावर वाहनांच्या रांगा लागल्या होत्या. नाताळ सण सोमवारी (२५ डिसेंबर) आहे. शनिवार आणि रविवारला नाताळची सुट्टी जोडून आल्याने मोठ्या संख्येने मुंबई-पुण्यातील पर्यटकांनी सकाळपासून गर्दी केली होती. पुण्याकडे येणाऱ्या मार्गावर खालापूर टोलनाका आणि खंडाळा घाटात वाहनांच्या रांगा लागल्या होत्या. वाहतूकीचा वेग कमालीचा संथ झाला होता. त्यामुळे घाटात इंजिन गरम होऊन मोटारी बंद पडत होत्या. मोटारी बंद पडल्याने कोंडीत भर पडली. घाट क्षेत्रातील वाहतूक



सुरळीत करण्यासाठी बोरघाट महामार्ग पोलीस, महाराष्ट्र सुरक्षा दलाचे जवान, तसेच अपघातग्रस्तांच्या मदतीला या संस्थेचे कार्यकर्ते प्रयत्न करत होते. खंडाळा बोगदा परिसरात मुंबईकडे जाणारी वाहने काही काळ थांबवून ठेवण्यात आली होती. मुंबईहून लोणावळ्याकडे येणाऱ्या मोटारींसाठी सर्व सहा मार्गिका खुल्या करुन देण्यात आल्या होत्या. मात्र, मोठ्या संख्येने मोटारी द्रुतगती मार्गावर आल्याने वाहतूक नियोजन करणाऱ्या पोलिसांची धावपळ उडाली. मुंबई पुणे एक्सप्रेसवेवर बोरघाटात तब्बल १० किलोमीटर वाहनांच्या रांगा लागल्या आहेत. यामुळे अनेक ठिकाणी पुण्याच्या दिशेने होणारी वाहतूक (तुंबली आहे. अडोशी टनेलच्या अगोदरपासून अमृतांजन ब्रिजपर्यंत व पुण्याच्या दिशेला खंडाळाकडे १० किलोमीटर वाहनांच्या रांगा लागल्या आहेत. जुन्या मुंबई पुणे मार्गावर पुण्याकडे जाताना शिंग्रोबाच्या अगोदरपासून मोठ्या प्रमाणात वाहने बंद आहेत. मोठ्या संख्येने महिला, लहान मुले रस्त्यावर बसून आहेत.

# नगर रस्त्यावरील दुमजली उड्डाणपूल आता रामवाडीपर्यंत

## येरवड्यापासून वाघोलीपर्यंतचा प्रवास वेगवान

**पुणे । न्यूज एक्सप्रेस मराठी।** नगर रस्त्यावरील वाहतुकीची कोंडी सोडविण्यासाठी प्रस्तावित दुमजली उड्डाणपूल वाघोलीऐवजी रामवाडीपर्यंत करण्यात येणार आहे. तसेच शास्त्रीनगर चौकात महापालिकेच्या माध्यमातून उड्डाणपूल आणि समतल विलगक (ग्रेड सेप्रेटर) उभारण्यात येणार आहे. पालकमंत्री, राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीत हा निर्णय घेण्यात आला. त्यामुळे येरवड्यापासून वाघोलीपर्यंतचा प्रवास वेगवान होणार आहे. नगर रस्त्यावरील वाहतूक कोंडी आणि हा रस्ता वाहतूक नियंत्रक दिवेमुक्त करण्यासंदर्भात वडगावशेरी विधानसभा मतदारसंघाचे



आमदार सुनील टिंगरे यांनी प्रश्न उपस्थित केला होता. यासंदर्भात बैठक घेण्याचे आश्वासन राज्य शासनाकडून देण्यात आले होते. त्यानुसार शनिवारी ही बैठक पालकमंत्री अजित पवार यांच्या अध्यक्षतेखाली झाली. त्यामध्ये हे निर्णय घेण्यात आल्याची माहिती टिंगरे यांनी दिली. नगर रस्त्यावरील वाहतूक कोंडी सोडविण्यासाठी राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाच्या माध्यमातून शिरूर ते वाघोली असा दुमजली उड्डाणपूल प्रस्तावित आहे. हा उड्डाणपूल विमाननगर-रामवाडीपर्यंत करण्याचा निर्णय घेण्यात आला. त्यासंदर्भातील सविस्तर प्रकल्प आराखडा करण्याची सूचना राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाला करण्यात आली. शास्त्रीनगर चौकातील कोंडी सोडविण्यासाठी महापालिकेकडून उड्डाणपूल आणि भुयारी मार्ग प्रस्तावित आहे. त्यासंदर्भातील निविदा प्रक्रिया तातडीने राबविण्यात यावी, अशी सूचना पवार यांनी केली. दरम्यान, रखडलेल्या शिवणे-खराडी रस्त्याबाबतही चर्चा झाली. या रस्त्यासाठी तातडीने भूसंपादन करावे. धानोरी, संतनगर, फाईव्ह नाईन चौक ते धानोरी आणि विश्रांतवाडी येथील पर्यायी रस्ते पूर्ण करण्यासाठी महापालिका अधिकाऱ्यांनी जागा पाहणी करावी आणि त्यासंदर्भात तातडीने निर्णय घ्यावेत, असेही पवार यांनी सांगितल्याचे आमदार टिंगरे यांनी स्पष्ट केले.यासंदर्भात

### वाघोली- येरवडा प्रवास वेगवान

» पालकमंत्री, राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीत हा निर्णय घेण्यात आला. त्यामुळे येरवड्यापासून वाघोलीपर्यंतचा प्रवास वेगवान होणार आहे. नगर रस्त्यावरील वाहतूक कोंडी आणि हा रस्ता वाहतूक नियंत्रक दिवेमुक्त करण्यासंदर्भात वडगावशेरी विधानसभा मतदारसंघाचे आमदार सुनील टिंगरे यांनी प्रश्न उपस्थित केला होता. यासंदर्भात बैठक घेण्याचे आश्वासन राज्य शासनाकडून देण्यात आले होते. त्यानुसार शनिवारी ही बैठक पालकमंत्री अजित पवार यांच्या अध्यक्षतेखाली झाली.

बैठक घेण्याचे आश्वासन राज्य शासनाकडून देण्यात आले होते. त्यानुसार शनिवारी ही बैठक पालकमंत्री अजित पवार यांच्या अध्यक्षतेखाली झाली. त्यामध्ये हे निर्णय घेण्यात आल्याची माहिती टिंगरे यांनी दिली. नगर रस्त्यावरील वाहतूक कोंडी सोडविण्यासाठी राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाच्या माध्यमातून शिरूर ते वाघोली असा दुमजली उड्डाणपूल प्रस्तावित आहे. हा उड्डाणपूल विमाननगर-रामवाडीपर्यंत करण्याचा निर्णय घेण्यात आला. त्यासंदर्भातील सविस्तर प्रकल्प आराखडा करण्याची सूचना राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाला करण्यात आली. शास्त्रीनगर चौकातील कोंडी सोडविण्यासाठी महापालिकेकडून उड्डाणपूल आणि भुयारी मार्ग प्रस्तावित आहे.

# चाकण परिसरात पुनर्वसनाच्या नावाखाली जमिनींचे घोटाळे

## शेतकरी चिंताग्रस्त असून जमिनीचे मोठ्या प्रमाणात घोटाळे

**पुणे । न्यूज एक्सप्रेस मराठी।** चाकण परिसरातील नाणेकरवाडी, कडाचीवाडी, मेदनकरवाडी, रासे, भोसे, काळुस या परिसरात मोक्याच्या जमिनींचे सातबारे काही जमीन खरेदी-विक्री करणारे एजंट करून घेत आहेत. काहींनी सातबारे तयार करून कोट्यावधी रुपयांना जमिनी विकल्या आहेत. यात काही टोळ्या सक्रिय आहे. पुनर्वसनाच्या नावाखाली भामा -आसखेड धरण प्रकल्प बाधित शेतकऱ्यांना काहीजण हाताशी धरायचे त्यांच्या नावाने या परिसरात मोक्याच्या जमिनी मिळवायच्या असा धंदा जमिनीची खरेदी-विक्री करणारे एजंट यांनी चालू केला आहे. चाकण परिसरात जमिनीच्या नोंदी होत आहेत. त्यामुळे मूळ शेतकऱ्याचे नाव सातबारा उताऱ्यावरून कमी होऊन प्रकल्प बाधित शेतकऱ्याचे नाव येत आहे. त्यामुळे परिसरातील शेतकरी चिंताग्रस्त झाला आहे. त्यामुळे आम्ही काय करायचे असा शेतकऱ्यांचा सवाल आहे. यामुळे शेतकरी चिंताग्रस्त असून जमिनीचे मोठ्या प्रमाणात घोटाळे झाले आहेत. चाकण, ता. खेड परिसरात, खेड तालुक्यात काही जमीन खरेदी-विक्री करणाऱ्या एजंटांचा धंदा मात्र तेजीत आहे. ही जमीन नेमकी प्रकल्प बाधित शेतकऱ्याला की एजंटाला असा प्रश्न निर्माण झाला आहे. एजंट त्या जमीनीचा सातबारा उतारा झाल्यानंतर ती जमीन तात्काळ कोट्यावधी रुपयाला विकत आहेत व कोट्यावधी रुपये कमवत आहे हे भयानक वास्तव आहे.ज्याच्या नावाने प्रकल्प बाधित म्हणून जमीन मिळवली त्याला थोडाच लाभ मिळत आहे. भामा-आसखेड धरण प्रकल्प झाल्यानंतर त्या प्रकल्पामुळे अनेक गावातील शेतकरी प्रकल्प बाधित झाले. काही शेतकऱ्यांना सरकारी रक्कम, जमिनी मिळाल्या तर काही शेतकरी जमिनी तसेच मोबदल्यापासून अजूनही वंचित राहिले. काही शेतकऱ्यांनी नुसता आर्थिक मोबदला घेतला तर काही शेतकऱ्यांना अजूनही आर्थिक मोबदला तसेच जमिनी मिळालेल्या नाहीत. त्यामुळे प्रकल्प बाधित शेतकरी अजूनही काही मोबदल्याच्या व जमिनीच्या प्रतीक्षेत आहेत.